पोचदेय नोंदणीकृत डाकेने

क्रमांक: एलइएन-२६७९-५३१७७-सीआर ११६७-ग-३
महसूल व वन विभाग,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक: २२-६-१९८७.

विषय :- जमीन - मुंबई उपनगर जिल्हा
स.नं. ११२, ११५ मौजे वडवली
सिंधी दुकानदारांच्या दुकानाच्या
अतिक्रमणाबाबत..

ज्ञापन:

अपर जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांना त्यांच्या वरील विषयावरील क्रमांक: सी-डेस्क-६-एलएनडी-आयवी-६२९, दिनांक २२-१-१९८२ च्या पत्राच्या संदर्भात असे कळविण्याचा मला आदेश आहे की, महाराष्ट्र जमीन महसूल (सरकारी जमिनीची विल्हेवाट) नियम, १९७१ मधील नियम ४३ व महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ मधील कलम ४० अन्वये "एक विशेष बाब" म्हणून मुंबई उपनगर जिल्ह्यातील वडवली गावाच्या भूमापन क्र. ११२ व ११५ यामधील १५६२ चौरस मीटर इतक्या जमिनीवरील अतिक्रमण नियमानुकूल करण्यास व ती खालील अटी व शर्ती यांना अधीन राहून वाणिज्य प्रयोजनासाठी ५० दुकानदारांना भाडेपट्ट्याने देण्यास शासन याद्वारे मंजुरी देत आहे. भाडेपट्ट्याचा कालावधी खालीलप्रमाणे राहील :-

१] १९५८ सालच्या बाजारभावाच्या ५ टक्के दराने १९५८ ते १९६९ च्या कालावधीसाठी भरावे.

२] १-६-१९७० च्या बाजारभावाच्या ६ $\frac{१}{२}$ टक्के दराने १९७० ते १९७७ या कालावधीसाठी भरावे.

३] १-१-७८ च्या बाजारभावाच्या ८ टक्के दराने १९७८ ते ३१-१२-१९८४ या कालावधीसाठी भरावे.

४] १ जानेवारी १९८५ च्या बाजारभावाच्या ८% दराने १-१-१९८५ ते ३१-१२-१९८६ या कालावधीसाठी भरावे.

५] १-१-१९८७ च्या बाजारभावाच्या ८% दराने १-१-१९८७ ते ३१-१२-१९९२ या कालावधीसाठी भरावे.

६] प्रत्येक अतिक्रमणदाराने रु. ५००/- इतका दंड भरावा.

७] भाडेपट्ट्याच्या कालावधीत वरील जमिनीवर भाडेपट्टेदाराने अगोदरच अनधिकृतपणे केलेल्या बांधकामामध्ये बऱ्याच मोठ्या प्रमाणात यानंतर [illegible] बदल केल्याचे अपर जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा, यांच्या

पृ.ना.प.

OFFICE OF THE
... COLLECTOR ...
11345
25/8(8)

नजरेस आल्यास, भाडेपट्टेदाराने कोणत्याही प्रकारची नुकसान भरपाई न मागता अतिक्रमित जमीन शासनाकडे परत देण्याची कबुली भाडेपट्टेदाराकडून घेण्यात यावी.

८] अपर जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा, यांच्या पूर्वपरवानगीशिवाय ही जमीन ज्या प्रयोजनासाठी ~~[illegible]~~ [दुकानासाठी] भाडेपट्टयाने देण्यात आली आहे. त्या प्रयोजनाव्यतिरिक्त दुसऱ्या कोणत्याही प्रयोजनासाठी भाडेपट्टेदाराने ह्या जमिनीचा वापर करता कामा नये.

९] या भाडेपट्टयाची मुदत संपण्या अगोदर रस्तारुंदीसाठी ही जमीन महापालिकेला पाहिजे असल्यास हा भाडेपट्टा रद्द करून या जमिनीचा ताबा भाडेपट्टेदार शासनास विना मोबदला व शांतपणे परत करील.

१०] वर नमूद केलेल्या शर्तींपैकी कोणत्याही शर्तीचा भंग झाल्यास, तसेच अपर जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा, हे महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ व त्याखालील नियमांच्या तरतुदीनुसार तसेच या प्रकरणातील परिस्थिती लक्षात घेता त्यांना योग्य व आवश्यक वाटतील अशा इतर अटी व शर्ती घालतील त्यापैकी कोणत्याही अटीचा किंवा शर्तीचा भंग झाल्यास भाडेपट्टेदारास भाडेपट्टयाने दिलेली ही जमीन कोणत्याही प्रकारची नुकसान भरपाई न देता परत घेण्याचे अधिकार शासनाकडे राहतील.

११] महाराष्ट्र जमीन महसूल [सरकारी जमिनीची विल्हेवाट] नियम, १९७१ मधील नियम ४३ नुसार विहित केलेल्या संबंधित नमुन्यात उपरोक्त अटी व शर्ती मान्य असल्याबाबतचा करारनामा भाडेपट्टेदाराने शासनाशी करावा.

२. वर उल्लेखिलेल्या अटी व शर्ती यांचा अंतर्भाव असलेला भाडेपट्टेदाराशी करारनामा करण्यासाठी, अपर जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांनी महाराष्ट्र जमीन महसूल [सरकारी जमिनीची विल्हेवाट] नियम, १९७१ मधील नमुना क्र. १५ वापरावा व त्यानंतर यासंबंधीचे जरूर ते अंतिम आदेश अपर जिल्हाधिकारी यांनी निर्गमित करावेत.

३. हे शासन ज्ञापन, नगर विकास विभाग, गृहनिर्माण व विशेष सहाय्य विभाग व वित्त विभाग यांच्या सहमतीने निर्गमित करण्यात आले आहे



Scanned by CamScanner

[पहा वित्त विभाग, अनौपचारिक संदर्भ क्रमांक: तीआर ४२६-व्यय-९, दिनांक ३.४.१९८७]

४. सोबत कागदपत्र [पृ. १ ते ४१] परत करण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नांवाने,

[ पी. वि. भट्टे ]
कक्ष अधिकारी,
महसूल व वन विभाग.

प्रति,

अपर जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा, मुंबई.

प्रत रवाना :-

आयुक्त, कोकण विभाग, कोकण भवन, नवी मुंबई.

अपर जिल्हाधिकारी [अतिक्रमण], मुंबई उपनगर जिल्हा, मुंबई.

सहाय्यक संचालक, नगररचना, मुंबई शहर भूमापन व भूमि अभिलेख, मुंबई.

महालेखापाल [१], महाराष्ट्र राज्य, मुंबई.

महालेखापाल [२], महाराष्ट्र राज्य, नागपूर.

नगरविकास विभाग [युडी-५]

गृहनिर्माण व विशेष सहाय्य विभाग [७-अ]

वित्त विभाग [व्यय-९]

महसूल व वन विभाग, कार्यासन ग-३ [निवड नस्तीकरिता]

Scanned by CamScanner